# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला

**दूरध्वनी क्र.: ०७२४-२२५८११९** **ई-मेल: directorcrs78@gmail.com**


जा.क्र. म.सं.के./तांत्रिक/ 610 /२०२३ दि. 03 / 08 /२०२३

### निविदा सूचना

**विषय:- सन २०२३-२०२४ मध्ये मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत सामान्य विभागावरील वाहनांवर कंत्राट पद्धतीने वाहन चालक लावण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून निविदा दर (कोटेशन) बोलविण्यासाठी व्यापक प्रसिद्धी करणेबाबत.....**

**संदर्भ:** कुलसचिव कार्यालय जा.क्र.बीईए/आस्था/कंत्राटी/कर्म/२०२१/५९४/ दि. २२ जून, २०२१.

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत सामान्य विभागावर तीन वाहन असून त्यावर वाहन चालक कंत्राट पद्धतीने लावण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.

२. निविदा/कोटेशन संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी.

३. कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४. कंत्राटदारास मिळालेल्या कामाच्या देयकाचे १० टक्के रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit) म्हणून संबंधित विभागाकडे जमा करावी लागेल व काम पूर्ण झाल्यावर सुरक्षा ठेव परत मिळण्याकरिता संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांचे कडे अर्ज करावा लागेल त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.

५. कंत्राट पद्धतीने पुरविण्यात येणाऱ्या वाहन चालकाकडे वैध वाहन चालक परवाना असणे आवश्यक आहे.

६. कंत्राट पद्धतीने पुरविण्यात येणाऱ्या वाहन चालकास कोणत्याही प्रकारचे व्यसन नसावे.

७. कंत्राट पद्धतीने पुरविण्यात येणाऱ्या वाहन चालकाचे वर्तणूक चांगली नसल्यास वाहन चालकास विना सूचना कामावरून बंद करण्याचे संपूर्ण अधिकार या कार्यालयास राहतील.

८. कंत्राट पद्धतीने पुरविण्यात येणाऱ्या वाहन चालकाला कामाच्या उपलब्धतेनुसार काम देण्यात येईल.

९. कंत्राट पद्धतीने पुरविण्यात येणाऱ्या वाहन चालकास कामावरून बंद करण्याचे संपूर्ण अधिकार या कार्यालयास राहतील.

१०. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय येथील वाहन चालवितांना वाहनाचे अथवा विद्यापीठ संपत्तीचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

११. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय येथील वाहन चालवितांना चालकाच्या चुकीमुळे कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जवाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१२. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

१३. कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

१४. कंत्राट पद्धतीने पुरविण्यात येणाऱ्या वाहन चालकास कामगार (Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पद्धतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे करांचा नियमाने व नियमित भरणा करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१५. या कार्यालयाचे वाहन चालकाचे काम करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१६. वाहन चालकाचे कामाचे दर एक वर्षा करिता वैध राहतील.

१७. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असल्याचे रु. १०० चे स्टंप पेपर वर करारनामा सादर करणे संबंधित कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१८. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. ११.०८.२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

संचालक<br>
मध्यवर्ती संशोधन केंद्र<br>
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# निविदा (कोटेशन) मसुदा

मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत सामान्य विभागावर तीन वाहन असून त्यावर वाहन चालक कंत्राट पद्धतीने लावण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून निविदा दर खालील प्रमाणे मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | दर (रु.) | शेरा |
|---|---|---|---|
| | शेती व प्रक्षेत्रा निगडीत सर्व मालाचे तसेच उत्पादित मालाचे दळणवळण करणे, ई. वैध परवाना धारक वाहन चालक | | प्रती वाहन चालक प्रती दिवस |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक:**

**स्वाक्षरी**

नाव व संपूर्ण पत्ता